दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३३७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.३ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दोन वर्षानंतर राज्यात बुधवारी शून्य कोरोना मृत्यूची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात येत असून राज्यातील रुग्णसंख्या कमी होताना दिसून येत आहे. आज राज्यात कोरोनामुळे एकही मृत्यू झालेला नाही. १ एप्रिल २०२० नंतर पहिल्यांदाच राज्यात एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही. जवळपास दोन वर्षानंतर राज्यात कोरोनामुळे एकही मृत्यू झाला नाही . गेल्या २४ तासात राज्यात कोरोनाच्या ५४४ नव्या रुग्णांची भर पडली आहे. राज्यात गेल्या २४ तासात १ हजार ००७ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. राज्यात आज ३८ ओमायक्रॉनबाधित रुग्णांची नोंद झालेली आहे. आतापर्यंत ४७७१ ओमायक्रॉनबाधितांची नोंद राज्यात झाली आहे. त्यापैकी ४६२९ रुग्ण ओमायक्रॉनमुक्त झाले आहे. सध्या राज्यात १०२ ओमायक्रॉनचे रुग्ण ॲक्टिव्ह आहेत. राज्यात आज शून्य रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर १.८२ टक्के झाला आहे. राज्यात आतापर्यंत ७७ लाख १३ हजार ५७५ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.०५ टक्के आहे.

# पनवेल शहर जिल्हा काँग्रेस ॲक्शन मोडवर

## पनवेल विधानसभा मतदारसंघ क्षेत्रामध्ये स्मार्ट सोसायटी स्पर्धेला प्रारंभ

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि तालुका काँग्रेस यांच्या वतीने पनवेल विधानसभा मतदार संघ कक्षेतील सोसायट्यांकरता स्मार्ट सोसायटी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. बुधवार दिनांक २ मार्च रोजी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर सी घरत यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत पत्रकार परिषद घेऊन या स्पर्धेची घोषणा केली. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कमांडर कलावंत, सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, पन–वेल अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष अरविंद सावळेकर, महिला आघाडी अध्यक्ष निर्मलाताई म्हात्रे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष हेमराज म्हात्रे, काँग्रेसच्या अनुसूचित जाती जमाती विभागाचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष मोहन गायकवाड, जिल्हा काँग्रेस पर्यावरण विभागाचे कार्याध्यक्ष ॲड अरुण कुंभार, सांस्कृतिक सेल महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राकेश चव्हाण उपस्थित होते.



जसजशा सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या वाढत आहे. तसतशा त्यांच्या समस्यांमध्ये देखील भरच पडत आहे. एक सुसंस्कृत उत्कृष्ट सहकारी गृहनिर्माण संस्था कशी असावी? याचे उत्तम उदाहरण शोधण्याकरिता व त्याचा आदर्श इतर संस्थानी घ्यावा या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सर्व संस्था, त्याचे पदाधिकारी व सदस्य यांच्यातील संबंध कसे सौहार्दाचे असावेत या साऱ्याची जाण अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांना व त्यांच्या पदाधिकाऱ्यांना व्हावी हा देखील उद्देश आहेच.या स्पर्धेची सुरुवात २ मार्च २०२२ पासून सुरू झालेल्या स्पर्धेची ३१ मार्च २०२२ ही स्पर्धेत सहभागी होण्याची अंतीम तारीख असणार आहे. विविध सोसायट्यांच्यात जाऊन त्यांना स्पर्धा समजून सांगायचे व त्यांना सहभागी करून घेण्याची जबाबदारी सोसायटी किंगडम या संस्थेला देण्यात आलेली आहे. या एक महिन्याच्या कालावधीत सोसायटी किंगडमचे प्रतिनिधी प्रत्येक संस्थेत जाऊन या स्पर्धेत सहभागी होण्याबद्दल पत्रकाद्वारे जागृती करतील, स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी ठरविलेल्या निकषांबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अवगत करून देतील.

या स्पर्धेत सहभागी होणा–या संस्थाकरिता सभासद संख्येनुसार गट पाडले जातील 'अ' गट यामध्ये ५० सदस्य संख्या असणाऱ्या संस्था 'ब' गट– यामध्ये ५१ ते १५० सदस्य संख्या असणाऱ्या संस्था व 'क' गट यामध्ये १५१ पेक्षा जास्त सदस्य असणाऱ्या संस्था अशी गटवार विभागणी असेल. क गटातील विजेत्या स्मार्ट सोसायटीला रुपये ५१ हजार सन्मानपत्र आणि चषक देण्यात येईल, ब गट विजेत्या स्मार्ट सोसायटीला रुपये २५ हजार प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येईल, तर अ गटातील स्मार्ट सोसायटीला रुपये २१ हजार प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

शिवाय पनवेल – नवीन पनवेल खादा कॉलनी (आसूडगावसह). कळंबोली – कामोठे– खारगर व नावडे, तळोजा फेज १ व २ (प्रभाग १ व २) ही सात पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शहरे याशिवास ४ जिल्हा परिषद हद्दीतील व पनवेल विधानसभा क्षेत्रातील आदई, विचुंबे,उसर्ली, सुकापूर, आकुर्ली, कोप्रोली, नेरे, करंजाडे, पळस्पे इ. नागरी वस्त्या असणारी गावे असे एकूण ८ विभागांकरिता स्वातंत्रपणे स्पर्धा असणार आहेत. प्रत्येक विभागवार रोख रक्कमेची बक्षिसे दिली जाणार आहेत. महाराष्ट्र शासन, सिडको प्रशासन व पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडे सोसायट्यांच्या प्रलंबित समस्या सोडवून घेण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना संगठीत करणे हा एकमेव उद्देश या स्पर्धेच्या आयोजनासाठी असल्याचे आर सी घरत यांनी सांगितले.

विजेता निवडीचे प्रमुख निकष : संस्थांची वार्षिक सभा पदाधिकारी व सभासदांचे एकमेकातील संबंध, इमारतीचा विमा संस्था नोंदणी व कन्व्हेन्स डीड, सामाजिक उपक्रमातील संस्थेचा सहभाग, पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी केलेल्या उपाय योजना, सुका कचरा / ओला कचरा यांचे विलगीकरण, राष्ट्रीय सणात सहभाग, कोरोना काळातील काही विशेष कार्य (असल्यास) या प्रमुख निकषासह छोटया-मोठया विषयावर आधारीत एका प्रश्नावलीच्या आधारे सोसायटी किंग्डमचे परिक्षक पाहणी करून अहवाल तयार करतील. या अहवालाच्या आधारे सहकार क्षेत्रातील सेवानिवृत्त अधिकारी विद्यमान अधिकारी व कर्मचारी यांची मदत घेऊन निकाल तयार केला जाईल व कोणतीहि तांत्रिक अडचण न आल्यास महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर १ मे २०२२ रोजी निकाल जाहीर करणे व बक्षिस समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल.

सहकारी गृहनिर्माण संस्थांकरिता अशी स्मार्ट सोसायटी स्पर्धा ही संकल्पना महाराष्ट्रात पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे. त्यामुळे ही स्पर्धा एकमेव असल्याने सहकार खात्याचे निश्चितच लक्ष वेधणारी असेल शिवाय भविष्यात अन्य शहरांमध्ये राबविण्यासाठी याचे अनुकरण केले गेले तर या स्पर्धेला पनवेल पॅटर्न म्हणून निश्चितच प्रसिध्दी मिळेल असा मला विश्वास वाटतो.

**आर सी घरत, अध्यक्ष**
**पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी.**

## पनवेलमध्ये रायगड जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) रायगड व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा तांदूळ व धान्य महोत्सवाचे आयोजन दि.०४ ते ०६ मार्च २०२२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वेळेत गुजराती शाळा, डॉ.आंबेडकर रोड, जुने पनवेल येथे करण्यात आले आहे.

तांदूळ, कडधान्य व भाजीपाला विक्री दालने, सेंद्रीय शेतकरी गटांची शेतमाल विक्री, महिला बचत गट उत्पादने–मसाला,पापड, लोणची इ. प्रदर्शन व विक्री तसेच शेतकऱ्यांसाठी कृषी तंत्रज्ञान परिसंवाद व चर्चा सत्र, शेतकरी उत्पादक ग्राहक परिसंवाद त्याचबरोबर कृषी विभागाच्या विविध योजनांचा प्रसार ही या प्रदर्शनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या महोत्सवात महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून खरीप हंगामात विविध योजनेंतर्गत भात पीक प्रात्यक्षिकामधून उत्पादित झालेले लाल, काळा, जांभळा भात तसेच इतर सुवासिक– इंद्रायणी, बारीक जातीच्या–वाडा कोलम, शुभांगी वाय एस आर इ. तांदळाची थेट शेतकऱ्यांकडून योग्य दरात ग्राहकांना विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत. तसेच रब्बी हंगामात उत्पादित कडधान्य तसेच भाजीपालाही थेट शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी उत्पादित केलेले विविध जातींचे तांदूळ, भाजीपाला, कंदमुळे, कडधान्य इत्यादी उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत. विविध महिला बचतगटांची उत्पादने व त्यांचे प्रदर्शनही ग्राहकांसाठी या महोत्स–वात प्रमुख आकर्षण असणार आहे. या महोत्सवात भेट देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाबाबत विविध परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरी पनवेल शहर व परिसरातील सर्व ग्राहक तसेच शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत आयोजित महोत्सवात सहभागी होऊन विकेल ते पिकेल–थेट शेतकरी ते ग्राहक संकल्पना साखळी विकसित करावी व जास्तीत जास्त शेतकरी उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

## १४ जिल्ह्यांचे निर्बंध शिथिल; सिनेमागृहे-हॉटेल्स १०० टक्के क्षमतेने सुरू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मागील काही दिवसांत कोरोना रुग्णांची संख्या कमी झाल्याने राज्य सरकारने राज्यात लागू असलेले नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने आता नवी नियमावली जारी केली आहे. या नुसार राज्यातील नाट्यगृहे, सिनेमागृहे आणि हॉटेल्स १०० टक्के क्षमतेने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

कोरोनाची स्थिती सुधारत असलेल्या जिल्ह्यांचा समावेश '–' श्रेणीत करण्यात आला असून उर्वरीत जिल्ह्यांचा समावेश 'इ' श्रेणीत करण्यात आला आहे. – श्रेणीत मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, भंडारा, सिंधुदुर्ग, नागपूर, रायगड, वर्धा, रत्नागिरी, सातारा, सांगली, गोंदिया, चंद्रपूर, कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश आहे.

या १४ जिल्ह्यात पूर्ण क्षमतेने हॉटेल्स, सिनेमा आणि नाट्यगृहे सुरू करण्यास परव–ानगी देण्यात आली आहे. तसेच पर्यटन आणि धार्मिकस्थळेही पूर्ण क्षमतेने सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे नाट्य, सिनेमासह पर्यटन आणि हॉटेल व्यवसायालाही मोठा दिलासा मिळाला आहे. इतर जिल्ह्यात हॉटेल, सिनेमा आणि नाट्यगृहे ५० टक्के क्षमतेनेच सुरू ठेवण्याची अट कायम ठेवण्यात आली आहे. मात्र, निर्बंध शिथील करण्यात आले तरी कोरोना नियमांचे पालन करण्याचे आवाहन राज्य सरकारने केले आहे.

## संक्षिप्त...

### एस.टी. कर्मचाऱ्यांना मोठा धक्का

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या तीन महिन्यांपासून राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी वेतन वाढ, राज्य सरकारमध्ये विलीनीकरण आदीं मागण्यांसाठी संप पुकारला आहे. याबाबत आज महत्वाची माहिती समोर आली आहे. राज्य एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचे राज्य सरकारच्या सेवेत विलीनीकरण करता येणार नाही, असा अहवाल हायकोर्टाने नेमलेल्या समितीने दिला असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करावे, या मागणीसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. या प्रकरणाची हायकोर्टात सुनावणी सुरू आहे. दरम्यान, हायकोर्टाने नेमलेल्या उच्च सदस्यीय समितीने आपला अहवाल कोर्टात सादर केला आहे. यानुसार, विलीनीकरणाची मागणी व्यावहारिक नसल्याचा निष्कर्ष त्रिसदस्यीय समितीने दिला आहे. राज्य एसटी महामंडळातील ९३ हजार एस टी कर्मचारी राज्य सरकारच्या सेवेत विलीनीकरण करणे व्यावहारिक नसल्याचेही या अहवालात म्हटले आहे. त्यामुळे आता एस टी कर्मचाऱ्यांचा विलीनीकरणाचा कायदेशीर मार्ग आता बंद झाला आहे. यामुळे आता संपकरी कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. आता एसटी कर्मचारी काय निर्णय घेतात, त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गावात कोणतीही विकास कामे शिल्लक रहाणार नाही : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तळा तालुक्याला जोडणाऱ्या म्हसळा तालुक्यातील निगडी ग्रामस्थांनी गाव–ाचा विकास करण्यासाठी निमंत्रित करून ग्रामस्थ महिला मंडळीकडे विकासात्मक संवाद साधण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. हि संधी आता खंडित न करता निगडी ग्रामस्थांनी मागणी केलेली विकास कामे आता शिल्लक राहणार नाहीत असे मनोगत खासदार सुनिल तटकरे यांनी अंगणवाडी इमारत बांधकाम उदघाटन कार्यक्रमात संबोधित करताना व्यक्त केले. गेली अनेक वर्षे निगडी गावाशेजारूनच म्हसळा तालुक्यातील अन्य गावात आम्ही प्रवास करीत असतो परंतु आम्हाला गावात येण्याची संधी कधी उपलब्ध झाली नव्हती. आता निगडीतील

मंडळीनी मागे काय झाले ह्याकडे दुर्लक्ष करून उद्याचे भविष्यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच महादेव भिकू पाटील (काँग्रेस), गाव अध्यक्ष गणू बारे (शिवसेना) आणि माहिला मंडळ अध्यक्षा संगीता आंबेकर यांनी विकास कामात मागणी केल्या नुसार ग्रामपंचायत इमारत, प्रवेशव्दारा जवळील वॉल कंपाऊंड बांधकाम, शाळेजवळून जाणारा दगडघूम रस्ता, गाव अंर्तगत रस्ते, महिला कार्यशाळा आदी निगडी करांच्या सर्व मागण्या पूर्ण करणार आसल्याचे खासदार तटकरे यांनी अश्वासीत केले. यावेळी कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष समीर बनकर, जिल्हा परिषद सभापती बबन मनवे, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, माजी सभापती उज्वला सावंत, माजी सभापती महादेव पाटील, नगराध्यक्ष असहल कादरी, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, पं.स.सदस्य मधुकर गायकर, युवक अध्यक्ष फैसल गीते, नगरसेवक नासीर मिठागरे, .../२

## अनेक अडचणीवर मात करून युक्रेनमधून परतली प्रचिती पवार भारतात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

युक्रेनमध्ये युद्धाची भयावह स्थिती असतानाही लहान वयात सुद्धा अनेक अडचणींना मात करीत अखेरीस पनवेलजवळील करंजाडे वसाहतीमध्ये राहणारी प्रचिती पवार ही अखेरीस आपल्या घरी परतल्याने तिच्या कुटुंबियांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

प्रचिती दिपक पवार ही एमबीबीएसचे शिक्षण घेण्यासाठी युक्रेनला गेली होती. ती सध्या इव्ह–ानो फ्रान्सक्रिस मेडीकलमध्ये शिकत होती. २०१९ साली तेथे शिक्षणासाठी गेली होती व तेथील एका अपार्टमेंटमध्ये राहत होती. अचानकपणे ७ दिवसापूर्वी रशिया व युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाले. परंतु पश्चिम क्षेत्रात राहत असल्याने याबद्दल तिला एवढी काही माहिती नव्हती. अचानकपणे तिच्या बहिणीचा तिला फोन आला व तुमच्या भागात युद्ध सुरू झाल्याची माहिती तीने दिली. परंतु यावेळी सुद्धा तिला खरे वाटले नाही. त्यामुळे तीने तिच्या मैत्रिणीशी संपर्क साधला असता तिला युद्धाची माहिती मिळाली व येथील परिस्थिती चिघळत चालल्याचे समजले. युद्धामुळे पवार कुटुंबिय सुद्धा करंजाडेमध्ये हवालदिल झाले होते व ते सातत्याने तिच्या व तिच्या मैत्रिणीच्या संपर्कात राहून परिस्थितीचा आढावा घेत होते. व लवकरात लवकर कोणत्याही परिस्थितीत आपल्या घरी या असे सांगत होते. युद्ध सर्वत्र पसरत गेले. त्यामुळे त्यांच्यामध्ये भितीयुक्त वातावरण आहे.



यावेळी प्रचिती व भारतात राहणाऱ्या तिच्या सहकाऱ्यांनी एकत्रित येवून या संकटाला तोंड देण्याची भूमिका घेतली. २४ फेब्रुवारीला त्यांना खारकिव्ह आणि किव्हमध्ये युद्ध जोरात सुरू झाले होते. तसेच ती राहत असलेल्या शहरातील विमानतळ उडविण्यात आल्याने अत्यंत बिकट परिस्थितीत झाली होती. त्यातच तेथील सरकारने २५ तारखेला भारतात परतण्यासंदर्भात त्यांना सुचना देण्यात आल्या. त्यानुसार त्यांनी परतीची तयारी सुरू केली. तेथील सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने त्यांच्या ग्रुपने खाजगी बस करून ५० जणांनी रोमानियाच्या बॉर्डरच्या अलिकडे थांबा घेतला. बॉर्डरवर मोठ्या प्रमाणात परतीची गर्दी असल्याने त्यांची बस तेथे जावू शकत नसल्याने ते सर्वजण तेथेच उतरले व त्यांनी १५ ते २० कि.मी. चालत जावून बॉर्डर गाठली. यावेळी तेथील सरकारने प्रत्येकाला भारत देशाचे झेंडे लावण्यास सांगण्यात आले होते. त्यांना १५ ते २० मिनिटे गेटच्या बाहेरच ठेवण्यात आले. नंतर रांगेत उभे करण्यात आले व आतमध्ये जावून देण्यात आले. व ८ ते ९ तास कागदपत्रे तपासणी व इतर सोपस्कारमध्ये गेली.

यावेळी त्यांना रोमानियाच्या सरकारने सुद्धा मदत केली व तेथून भारताच्या एमबीसीने सुद्धा मदत केली. कडाक्याची थंडी, अन्न पुरवठा कमी, पाणी कमी या स्थितीतही या मुलींनी कोणत्याही परिस्थितीत मायदेशी परतायचा हा निर्धार केला होता. या सर्व संकटाचा सामना करत तीने अखेरीस विमानतळ गाठले. देशाने या विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून त्यांच्या परतीसाठी व्यवस्था केली होती. परंतु हीच व्यवस्था एमबीसीने युक्रेनच्या बॉर्डरपर्यंत केली असती तर अजून लवकर कित्येक मुले भारतात परतली असती, असे या परतणार्या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. आजही खुप मुले ताटकळत तेथे बसली आहेत. त्यातच परिसरात होत असलेले कानठळ्या बसविणारे बॉम्ब हल्ले त्यामुळे वातावरण सर्वत्र भितीयुक्त आहे. अनेकजण बंकर्स व मेट्रोमध्ये आश्रयास राहिले आहेत. तरी देशाने याबाबत अजून पुढाकार घेवून लोकांना बॉर्डरवरुन आपल्या देशामध्ये आणण्यासाठी यंत्रणा सज्ज करावी, असे त्यांचे मत आहे. प्रचिती पवार जेव्हा मायदेशी परतले तेव्हा पवार कुटुंबियांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. आज प्रचितीला आपण घरी परतल्याचा आनंद आहे. परंतु तिच्या बरोबर त्या ठिकाणी शिक्षण घेणारे अजून आपल्या देशातील मित्र मंडळी तेथे अडकल्याने ते सुद्धा लवकर परतावे हिच तिची इच्छा आहे.

# रायगड जिल्हा पावरलिफ्टिंग निवड चाचणी स्पर्धा संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

केएमसी कॉलेज खोपोली येथे जिल्हास्तरीय क्लासिक निवड चाचणी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मुलींच्या गटात अमृता भगत, मुलांच्या गटात प्रथमेश भालेकर आणि सिनिअर गटात अक्षय शनमुगम हे विजयी झाले.

या स्पर्धेत अनेक मान्यवर पंच आले होते. यामध्ये प्रामुख्याने मधुकर पाटकर (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, ठाणे) सतिष पाताडे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), संजय रहाटे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), संतोष बांद्रे (शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), गोपीनाथ पवार (आंतरराष्ट्रीय पदक विजेते) स्वप्नील पाटील (ठाणे), विनायक कारभारी (ठाणे जिल्हा अध्यक्ष) आणि सुश्मिता देशमुख (आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त)यांनी काम पाहिले.

तसेच मदतनीस म्हणून बुधाजी कांबळे (मुंबई), राजबहादूर शर्मा (मुंबई), प्रज्ञा पवार (महाड) यांनी काम केले. या स्पर्धेचे आयोजन रायगड पावरलिफ्टिंगचे अध्यक्ष गिरीष वेदक यांच्या मार्गदर्शनानुसार सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव यांनी राहुल गजरमल, विनायक पाटील, प्रा.माने सर, राजेश अंगत यांच्या सहकार्याने केले होते.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ज्येष्ठ क्रीडा कार्यकर्ते शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मारुती आडकर यांच्या हस्ते झाला.

# कळंबोलीमधून वृद्ध इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

७३ वर्षीय वृद्ध इसम कळंबोली येथील राहत्या घरातून बेपत्ता झाल्याने ते हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

रामाधार चुलहाई सिंग (७३ रा.सेक्टर १७, रोडपाली, कळंबोली) उंची ५ फुट ३ इंच, रंग गहुवर्णीय, मजबूत बांधा, डोक्याच्या समोरील बाजूस टक्कल असून उजव्या बाजूस वाकून चालतात.

अंगामध्ये पांढरंट रंगाचे हाफ शर्ट आणि काळ्या रंगाची साधी पॅन्ट घातलेली आहे. त्यांना हिंदी भाषा अवगत आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो.ना.सुनील मासुळ यांच्याशी संपर्क साधावा.

# उरणच्या धुतुम गावातील सासऱ्याने दिले सुनेला जिवनदान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील स्नेहा सागर ठाकुर यांचे लग्न होवुन जसखार गावातुन धुतुम गावात ठाकुर कुटुंबियांची सुन म्हणुन आल्या. परंतु स्नेहा ठाकुरच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्यानंतर आपल्या जीवाची पर्वा न करता ६३ वर्षीय स्नेहाचे सासरे प्रभाकर ठाकुर यांनी सुन स्नेहा ठाकुर हिला आपली एक किडनी देऊन आयुष्य दिले आहे.



उरण तालुक्यात धुतुम गावात ३५ वर्षीय स्नेहा सागर ठाकुर यांनी आपल्या आयुष्यात दुसऱ्यांदा बाप पाहिलाय. स्नेहाला तीचे सासरे प्रभाकर ठाकुर ह्यानी किडनी देऊन जीवनदान दिले आहे. सासरा आणि सुनेच्या नात्याने समाजा समोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ही हृदयस्पर्शी कथा आहे. अपोलो हॉस्पिटलमधील. जिथे एक देवारूपात आलेले सासरे प्रभाकर ठाकुर यांनी आपल्या आजारी सुनेसाठी किडनी दान देऊन एक आदर्श निर्माण करण्याचे काम केले आहे.

रक्तगट विसंगत असतांनाही डॉ रविंद्र निकालजे व डॉ अमोल कुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली किडनी प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्न स्नेहा ठाकुर हिच्यावर गेल्या ८ महिन्या पासून डायलिसिस उपचार सुरू होते. तिच्या या स्थितीमध्ये तिची मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली पाहिजे असे निदान रविंद्र निकालजे (मूत्रपिंड तज्ञ) यांनी केले. कठीण परिस्थितीत, स्नेहा ठाकुर हिचे सासरे प्रभाकर ठाकुर यांनी सुनेला मूत्रपिंड दान करण्याचा एक धाडसी आणि कौतुकास्पद निर्णय घेतला. आपण अजूनही अशा समाजात रहातो जिथे आजही लग्नात हुंडा घेण्याची परंपरा अस्तित्वात आहे. परंतु एका सासऱ्यांनी सिद्ध केले की सर्व संबंध रक्ताच्या नात्यांनी बांधलेले नसतात आणि त्यांनी एक पाऊल पुढे येऊन आपल्या सुनेला मूत्रपिंड दान केले.

हाच आदेश समाजात रूढ झाला तर सासू सून आणि सून सासरे हे नाते अधिक दृढ होईल.प्रभाकर ठाकूर यांनी किडनी दान करत सामाजिक आदर्शाचा पाठ समाजासमोर निर्माण केला आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# एसटी सेवा पुर्ववत चालू करण्यासाठी म्हसळा कुणबी समाजातर्फे तहसील कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेल्या अनेक महिन्यापासून एस.टी संप सुरू आहे त्या संपामुळे गोर गरीब जनतेला तसेच विद्यार्थ्यांना प्रवासाअभावी खूप मोठया अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. नागरिकांचें जन जीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. अनेक वेळा विविध संघटनेने एस. टी चालू करण्याबाबत विनंती करूनही अद्याप एस. टी. कर्मच्यारांना विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती, आणि सर्वसाधारण नागरिक यांच्या बदल सहानुभूती निर्माण होत नाही. आणि त्यामुळे सामाजिक बांधिलकी म्हणून म्हसळा तालुका कुणबी समाजाने मोर्च्या काढून शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणेचे मोर्च्याच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

आज बुधवार दि.०२ मार्च, २०२२ रोजी म्हसळा एस. टी. स्टॅन्ड ते तहसिल कार्यालय या ठिकाणी शांततापुर्ण व नियमांचे पालन करून निदर्शने व मोर्च्या काढण्यात आला.तहसीलदार यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना लेखी निवेदन देण्यात आले. तालुक्यातील ८४ गावामध्ये लोकांची दळण वळण प्रक्रिया करण्यास जनतेला प्रवासासाठी त्रास होत आहे तालुक्यातील बहुजन समजाच्या कामासाठी आणि मुलांच्या उच्च शिक्षणासाठी तसेच आरोग्य बाजार रहाट अशा करणांसाठी होणारी गैरसोय दूर व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# पालीतील अनुज सरनाईक याची सुवर्ण कामगिरी



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

दिव–दमण येथे दिनांक २६ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी रोजी झालेल्या तिसऱ्या वेस्ट झोन पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशिपमध्ये ८५ ते ९० वजनी गटात अनुज सरनाईक यांनी सुवर्णपदक पटकावले. या अंतिम सामन्यांमध्ये राजस्थानच्या खेळाडूला हरवून पालीतील अनुज सरनाईक याने सुवर्ण पदक पटकावले आहे.

लॉकडाउन नंतरच्या झोन पिंच्याक सिल्याट चॅम्पियनशिप दिव–दमण येथे सुवर्णपदक पटकावल्याने खूप आनंद होत आहे. असे अनुज सरनाईक याने पत्रकारांना माहिती देताना सांगितले. अनुजच्या या यशाने रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. भारतीय पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर प्रकाश येवले यांचे मार्गदर्शन लाभले तसेच अनुजचे अभिनंदन देखिल केले आहे.


## दैनिक रायगड नगरी

वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन
(सेंट्रल रुल्स, १९५६ नियम ८ अन्वये)

**१) प्रकाशन स्थळ** : १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स टिळक रोड, जुने रतन टॉकीजवळ, पनवेल–४१०२०६, जि.रायगड
प्रकाशनाचे कालमान : दैनिक
**२) मुद्रकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**३) राष्ट्रीयत्व** : भारतीय
**४) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल–४१०२०६, जि.रायगड
**५) मालकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**६) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल–४१०२०६, जि.रायगड
**७) संपादकाचे नाव** : सुनिल कृष्णाजी पोतदार
**८) पत्ता** : पवन अपार्टमेंट रुम नं.१०३, १ ला मजला, लोखंडी पाडा, अशोक बागेसमोर पनवेल–४१०२०६, जि.रायगड

मी **सुनिल कृष्णाजी पोतदार** याद्वारे असे जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.
दि.३ मार्च २०२२

**सही/–**
**सुनिल कृष्णाजी पोतदार**
**(प्रकाशकाची सही)**



अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.१०३/२०१९
नि.नं.१६/ड
ने.ता.०३/०३/२०२२

गणपत गंगाराम हरमळकर वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
१) विकास कमल सुराना
२) रिलायन्स जनरल इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला
प्रति,
सामनेवाला नं.१) विकास कमल सुराना
केएल–५, रुम नं.६,
बिल्डींग नं.सी–७, सेक्टर नं.४,
कळंबोली नोड, पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२१८

दिनांक ०३/०६/२०१९ रोजी सकाळी (पहाटे) ४.३० वाजण्याच्या सुमारास मौजे : कानसई येथे मुंबई–गोवा हायवेवर, कानसई फाट्यापासून ५० फुटावर, नागोठणे पोलीस ठाणे, ता.रोहा, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांचा मुलगा अंकेश गणपत हरमळकर हा मयत झालेला आहे.

सदर अपघातामध्ये ट्रक क्र.एम.एच.०६/एक्यु ७७६२ वरील चालक हा अंकेश गणपत हरमळकर यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.२०,००,०००/– ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.०३/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेख म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख २४/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **जि.न्याया.रायगड–अलिबाग** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **जि.न्याया.रायगड–अलिबाग**



मुजावर सो कोर्ट

ॲड.राजश्री खाडगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालयात व.स्तर पनवेल
चौ.अर्ज क्र.१९०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/४/२०२२

१) श्रीमती.जयश्री सखाराम पवार
रा.नियर साई बाबा मंदिर, जे १/२
जय भारत हौसिंग सोसायटी,
काजूपाडा पाईपलाईन साकीनाका, मुंबई–४०००७२
२) श्रीमती.संजीवनी संजय सकपाळ
प्रगती चाळ कमिटी, नेहरु नगर वसाहत, बिल्डींग नं.३,
एच.एम.रोड, बी.एम.सी. सायन बिल्डींगच्या मागे,
कोळीवाडा, मुंबई–४०००२२
३) श्री.जयेश सखाराम पवार
४) श्री.आशिष सखाराम पवार
रा.नियर साई बाबा मंदिर, जे १/२
जय भारत हौसिंग सोसायटी,
काजूपाडा पाईपलाईन साकीनाका, मुंबई–४०००७२ — अर्जदार

अर्जदार क्रमांक १) श्रीमती.जयश्री सखाराम पवार यांचे पती व अर्जदार क्रमांक २) श्रीमती.संजीवनी संजय सकपाळ आणि अर्जदार क्र.३) श्री.जयेश सखाराम पवार, अर्जदार क्र.४) श्री.आशिष सखाराम पवार यांचे वडील श्री.सखाराम के.पवार हे दि.०९/०४/२०१४ मुंबई येथे मयत झाले असून त्यांच्या मालकीची मिळकत खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे परिशिष्ट**

Flat No.202, on the Second floor in B wing, admeasuring about Built up area of 36.64 Sq.Mtrs. (Carpet area of 328.61 Sq. Ft.) in the society known as "GOLDEN VIEW CHS LTD", Plot No.47, Sector-6-A, Kamothe, Taluka-Panvel, Dist-Raigad

मिळकतीची एकूण किंमत रु.४,४९,७५०/–

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे नाव वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केला आहे. तरी वरील मिळकतीबाबत जर कोणाची काही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध अगर तक्रारी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या न्यायालयात करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत वा तक्रार न आल्यास व अर्जदाराचे हक्क शाबीत झाल्यास अर्जदाराचे विनंती प्रमाणे त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.२/३/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



राव साहेब
प्रो.जमा १–२५

अर्जदाराचे वकील
ॲड.प्रदीप श. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (ज्यु.डी./सि.डी.) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२२७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/३/२०२२

कै.कुलवंत कौर अमरिक सिंग संधू (मयत तर्फे वारस)
श्री.पलविंदर सिंग अमरिक सिंग संधू
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.१७७, बाल सहयोग मित्र मंडळ,
चाळ नं.१९, रमाबाई कॉलनी, घाटकोपर ईस्ट मुंबई — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी कै.कुलवंत कौर अमरिक सिंग संधू हे दि.१६/१२/२०२१ रोजी मौजे : खारघर येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : द्रोणागिरी नोड, ता.उरण, जि.रायगड**

| सेक्टर क्र. | बिल्डींग नं. | सदनिका क्र. | बिल्डींग नाव | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|---|---|
| १२ | एल ०३ | १२०२ | मास हाऊसिंग सोसायटी | २९.८२ |

कै.कुलवंत कौर अमरिक सिंग संधू यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २/३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



राव साहेब

वकील : पि.जी.दानवले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१८९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०३/२०२२

श्रीमती.कल्पना बाबासाहेब पाटील — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.महेंद्र बाबासाहेब पाटील
२) सौ.स्मिता संदीप पाटील
अर्जदार व सा.वाले रा.फ्लॅट नं.जी–२०१, साई संसार सीएचएस, प्लॉट नं.३०, सेक्टर ५, नवीन पनवेल ४१०२०६ — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.बाबासाहेब शंकर पाटील हे पनवेल येथील कायमस्वरुपी रहिवाशी होते. त्यांचा मृत्यू ११/०४/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे झाल्याने अर्जदार यांनी कै.बाबासाहेब शंकर पाटील यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

**परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन**

A) Apartment No.B-10/9/4:4, Sector-13, Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad, Admeasuring Area Sq.Mtrs.

B) Flat No.201, 2nd Floor, Admeasuring Area 584 Sq.Ft. Sai Sansar Complex, Plot No.30, Sector-5, New Panvel (E), Navi Mumbai, Tal-Panvel, Dist-Raigad

वरील अर्जदार या कै.बाबासाहेब शंकर पाटील यांच्या पत्नी आहेत. सामनेवालं न१. हा मुलगा असून सामनेवाले नं.२ ही विवाहित मुलगी आहे. त्याप्रमाणे अर्जदार व सा.वाले कै.बाबासाहेब शंकर पाटील ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते कै.बाबासाहेब शंकर पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.महेश शांताराम खानावकर रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी मौजे : पडघे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची १३ गुंठे जमीन मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पडघे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्र/हेक्टर आर. | आकार |
|---|---|---|---|
| ४९ | ४ | ०–१२–००<br>पो.ख.0–0१–०० | |

शेतजमीन मालक : श्री.लहू देहू पाटील, रा.खानाव, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड
श्री.एकनाथ चांगो देशेकर, रा.चिंध्रण, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड

तरी वरील मिळकतीचे बबातीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, विकासनकरार, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, लिन, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट वगैरे चा प्रकारचा कोणताही हक्क किंवा हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या लेखी हरकतीसह माझे अशिलांच्या पत्यावर किंवा वकीलांच्या पत्यावर लेखी, प्रथमदर्शनी पुराव्यासह रजिस्टर पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात.

वरील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अन्य कोणलाही व्यवहाराबाबत हरकत असल्यास त्यांनी आमच्या अशिलांना प्रत्यक्ष भेटून व्यवहार / सल्लामस्सलद करावा.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०३/२०२२

**सही/–**
**ॲड.सचिन बाबुराव कांबळे**
**घर नं.१३७, मु.पो.खारघर गाव,**
**सेक्टर १३, लुंबिनी बुद्ध विहार जवळ, ता.पनवेल, जि.रायगड,**
**नवी मुंबई–४१०२१०**



श्री.मुजावर सो.कोर्ट

ॲड.प्रिती जगदीश भारती

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

श्रीमती.शांताबाई गुलाब हिंगडे
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.के.एल.१, टाईप–एक्स, सदनिका क्र.४,
गणेश मंदिर जवळ, सेक्टर ५ ई,
कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.सुभाष गुलाब हिंगडे
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.रवीकिरण को.ऑप.हौ.सो., सदनिका क्र.२०२,
सेक्टर ७, प्लॉट नं.१९, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९
२) श्री.सुनील गुलाब हिंगडे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.अंबाजी पार्क, सदनिका क्र.४०२, सेक्टर १७,
रोडपाली, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.गुलाब सखाहरी हिंगडे यांचा मृत्यू दि.०५/११/२०१३ रोजी रा.के.एल १, टाईप–एक्स, सदनिका क्र.४, सेक्टर ५ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. कै. गुलाब सखाहरी हिंगडे हे हयातीत असताना कै.गुलाब सखाहरी हिंगडे यांनी दि.०८/१२/१९९७ रोजी शिवशरण मेसप्पा मलप्पा यांच्याकडून रजिस्टर करारनामाने के.एल.१ टाईप–एक्स, सदनिका क्र.४, सेक्टर ५ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८, क्षेत्रफळ ४८९ चौ.मी. ही सदनिका विकत घेतलेली आहे.

सदरचा करारनामा अनु क्र.२६०८/१९९७ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दि.०८/१२/१९९७ रोजी नोंदविलेला आहे.

सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.२८ माहे ०२ सन २०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

# गावात कोणतीही विकास कामे शिल्लक रहाणार नाही : खा.सुनील तटकरे

सरपंच अनिल बसवत, संतोष उर्फ नाना सावंत, किरण पालांडे, गजानन पाखड, महेश घोले, प्रकाश गाणेकर, महिला अध्यक्षा रेश्मा कानसे, मीना टिंगरे, अनिल टिंगरे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी खा.तटकरे यानी निगडी गावात मला महाशिवरात्रीच्या पावित्र दिवशी येण्याची संधी मिळाली ती सुध्दा आज विकास कामाच्या उद्घाटनासाठी हे माझ्यासाठी आणि निगडीकरांसाठी भाग्याचे आसल्याचे सांगत मोठया प्रमाणांत उपस्थित असलेल्या महीलांसाठी पालकमंत्री ना.आदीती तटकरे यांच्या निधींतून माहिलांसाठी सभागृह देण्याचे मान्य करतानाच यापुढे निगडीत विकास कामाचे भूमिपूजन उद्घाटन –भूमिपूजन हे सुरुच रहाणार आसल्याचे त्यांनी जाहीरपणे सांगितले. महिलांनी भविष्यात पर्यटन व्यवसायावर अधारीत कौशल्य विकास व्यवसाय करावा असे मार्गदर्शन करतानाच मागे काय घडले याचा विचार करण्यापेक्षा उद्याचा उषःकाल पहावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सरपंच महादेव पाटील यांनी केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दोन वर्षानंतर प्रथमच छोटे सायंन्टीसचे सायन्स प्रदर्शन कामोठेमध्ये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज राष्ट्रीय सायन्टिंश दिवस दोन वर्ष नंतर कामोठे च्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये सायन्स प्रदर्शन आयोजन करण्यात आले होते या मध्ये पनवेल नवी मुंबई मधील शाळांनी आपल्या छोटे सायंटिश विद्यार्थी सहभाग घेतला पाणी नियोजन करोना अपघात होऊ नये वीज निर्मिती विविध विषयांवर शाळा च्या विद्यार्थी आपले प्रोजेक्ट्स केले होते सेवा सहयोग यांच्या माध्यातून आयोजन करण्यात आले होते

सेवा सहयोग फाऊंडेशन संस्थेद्वारे फिरती विज्ञान प्रयोगशाळा चालवत आहे ज्या नॉलेज ऑन व्हील म्हणून ओळखल्या जातात. सोप्या भाषेत म्हणायचं झालं तर चालत्या फिरत्या प्रयोग शाळा ! या नॅनो रॉकेट गाड्या विविध भागांत फिरतात. ह्या वॅन शिक्षकांसहित अशा सर्व शाळात आणि वस्तीमध्ये जातात जिथे सुसज्ज प्रयोगशाळा नाहीत व अभ्यासक्रमातील विविध प्रयोग मुलांना करून दाखवतात. आपणा सर्वांना माहीत आहे की, २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. यावर्षीही सेवा सहयोग फाऊंडेशनने छोटे शास्त्रज्ञ! हि नाविन्यपूर्ण कल्पना घेऊन हा दिवस साजरा केला. विद्यार्थ्यांना विज्ञान मॉडेल बनवण्यास सांगितले होते जे २८ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित केले होते, विद्यार्थ्यांना रॉकेट मेकिंग आणि आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा व खेळ आयोजित केले होते त्या स्पर्धे तील विजेत्यांचा बक्षीस देऊन शाबासकी दिली गेली.

विभाग –नवी मुंबई, घाटकोपर, विरार, भाईंदर सहभागी शाळा –९४ शाळा व अभ्यासिकेचे शिक्षक संख्या –२३९ सहभागी विद्यार्थी –११३४ विज्ञानाचे प्रयोग (मॉडेल्स)–३२९ स्वयंसेवक –७५ आपल्या सभोवती घडणार्या घटनांमागे कोणते वैज्ञानिक सत्य आहे हे शोधण्याची जिज्ञासा मनात निर्माण होणे हि त्या विद्यार्थ्यांची संशोधक बनण्याची वाटचाल आहे. ह्या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट्य असे मुलांनी विज्ञानाची कास धारावी, विज्ञान विषयाची गोडी निर्माण व्हावी आणि याचा एकंदर फायदा मुलांच्या शैक्षणिक विकासात व्हावा !

## चाळीस वर्षीय इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मीनाताई हॉस्पिटल जवळ गणेश मेडिकल शेजारी फुटपाथ जवळ नेरूळ येथे पोलिसांना बेशुद्ध अवस्थेत एक इसम सापडून आला. त्याला उपचारासाठी मनपा हॉस्पिटल, वाशी येथे दाखल केले असता तो मयत झाला असल्याचे घोषित करण्यात आले.


या इसमाच्या नातेवाईकांचा शोध नेरूळ पोलीस करत आहेत. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी नेरुळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एन आर शिरसाठ यांच्याशी संपर्क साधावा.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# माणगाव विभागीय क्रीडा संकुल येथे १०० युवा क्षमतेचे युवा वसतिगृह स्थापण्यास शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान

## कु.आदिती तटकरेंचा जिल्ह्यातील विकासकामांचा धडाका सुरूच



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे युवा धोरण २०१२ मध्ये युवा वसतिगृह स्थापन करणे, ही एक महत्त्वाची बाब अंतर्भूत आहे. संबंधित युवा वसतिगृह प्राधान्याने विभागीय क्रीडा संकुलाच्या ठिकाणीच जागा उपलब्धतेनुसार विकसित करण्यात यावे, असे शासनाचे निर्देश आहेत. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यासह कोंकण विभागातील युवकांना भावी आयुष्याच्या जडणघडणीसाठी परीक्षा, प्रशिक्षण, मुलाखती, शिबिरे, चर्चासत्रे या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतावाढीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी हक्काचे निवासस्थान माणगाव येथील विभागीय क्रीडा संकुलातच स्थापण्यास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

कोकण विभागीय क्रीडा संकुल रायगड जिल्ह्यात माणगाव तालुक्यातील मौजे नाणोरे येथे उभारण्यासंदर्भात शासनाकडून अलिकडेच प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या ठिकाणी पुरेशी, पोषक व सर्वच दृष्टीने अनुकूल जागा उपलब्ध असल्याने येथे युवा वसतिगृह उभारावे, अशी आग्रहाची विनंती पालकमंत्री कु.तटकरे यांनी शासनाला केली. ही विनंती मान्य करीत क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्री.सुनील केदार यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने दि.२४ नोव्हेंबर २०२१ रोजी मंत्रालयात संपन्न झालेल्या बैठकीत माणगाव येथे युवा वसतिगृह उभारण्यास मान्यता दिली आहे.

अशा प्रकारे जिल्ह्याच्या विविध विकासकामांच्या यादीत आणखी एका लोकोपयोगी महत्त्वपूर्ण बाबीचा समावेश झाला आहे. पालकमंत्री कु.तटकरे यांच्याकडून जिल्ह्याच्या विकासकामांना शासनाकडून मंजुरी व त्यासाठी आवश्यक निधी मिळवून आणण्याचा धडाका सुरूच असल्याचे दिसून येत आहे. एकूणच कोकण विभाग अन् जिल्ह्याच्या दृष्टीने हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

राज्याचे युवा धोरण २०१२ नुसार शासनाच्या २८ एप्रिल २०१४ च्या शासन निर्णयान्वये युवा वसतिगृहाची स्थापना ही योजना कार्यान्वित करण्यात आली. राज्यातील युवांना भावी आयुष्याच्या जडणघडणीसाठी परीक्षा, प्रशिक्षण, मुलाखती, शिबिरे, चर्चासत्रे यामध्ये सहभागी होता यावे तसेच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यासाठी आयोजित उपक्रमांमध्ये युवकांना सहभागी होता यावे, या दृष्टीने युवांना हक्काचे निवासाचे स्थान उपलब्ध व्हावे, यासाठी वसतिगृहांची निर्मिती करणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन शासनाने ही योजना सुरू केली आहे.

त्यानुसार राज्यात प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी रुपये चार कोटी निधीच्या मर्यादेत कोकण, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागाच्या ठिकाणी सुसज्ज असे युवा वसतिगृह निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय प्रतिवर्षी १२ लाख इतका व्यवस्थापन खर्चही देण्यात येणार आहे. तसेच या वसतिगृह उभारणीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती उभारणी व व्यवस्थापन प्रक्रिया करणार आहे.

या वसतिगृहामध्ये १०० युवांची निवास व्यवस्था असेल. युवक–युवती यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. या ठिकाणी ई–लायब्ररी, फर्निचर, कॅन्टीन, कॉन्फरन्स हॉल, दूरदर्शन संच, संगणक इत्यादी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. १०० युवांची बैठक व्यवस्था होईल, असे अद्ययावत सभागृह यात असणार आहे.याचा वापर चर्चासत्र, बैठका, स्लाईड–शो, परिसंवाद, युवांच्या कलागुणांचे सादरीकरण इत्यादीसाठी करता येणार आहे. वसतिगृहातील काही कक्ष वातानुकूलित करण्यात येणार आहेत जेणेकरून राष्ट्रीय– आंतरराष्ट्रीय उपक्रमासाठी येणाऱ्या युवांसाठी निवासाची उत्तम सोय म्हणून याचा वापर करता येईल. या वसतिगृहामध्ये १६ ते ३५ वयोगटातील युवांना प्रवेश दिला जाणार आहे तसेच येथील युवा उपक्रमांमध्ये कार्यक्रमाच्या निमित्ताने सहभागी होणारे केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी–कर्मचारी, निमंत्रित, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी इत्यादींना प्रवेश दिला जाणार आहे. युवा वसतिगृहामध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राखीव ठेवण्यात येणार असून महिलांसाठी वेळप्रसंगी ज्यादा कक्ष प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील.

कोकण विभागातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगाव येथे विभागीय क्रीडा संकुल आणि त्याचबरोबर युवा वसतिगृह उभारल्यामुळे संपूर्ण कोकण विभागातील तसेच रायगड जिल्ह्यातील युवांना व खेळाडूंना विविध क्रीडा सुविधा मिळण्याच्या दृष्टीने याचा निश्चितच लाभ होणार आहे. या युवा वसतिगृहाच्या माध्यमातून अनेक युवक–युवतींची भविष्यातील वाटचाल अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

## श्री संप्रदाय उरण तालुका तर्फे वशेणी येथील पीडित कुटुंबास आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । उरण**

श्रीमती कुसुम रामकृष्ण गावंड यांचे घर दिनांक २०/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ७:१५ च्या सुमारास जळुन खाक झाले होते. त्या घराची पहाणी करून आल्यावर श्री नरेंद्र महाराज यांचे भक्त, शिष्य आणि हितचिंतक यांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकीतून आर्थिक मदत गोळा केली.

दोन दिवसांत आपल्या प्रपंचाची तमा न बाळगता दात्यांनी रक्कम गोळा केली व पीडित कुटुंबाला सुपूर्द केली. दिनांक २६/०२/२०२२ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता प.पु.स्वामीजींच्या (नरेंद्र महाराजांच्या) प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून स्वामीजींचा गजर करत श्रीमती कुसुम रामकृष्ण गावंड यांच्याकडे जाऊन जमा झालेली रक्कम पंधरा हजार रुपये त्यांना सुपूर्द केली आहे. देणगी सुपूर्द करताना जीवन रोहीदास गावंड सरपंच वशेणी, ह.भ.प.अनिल गावंड महाराज, नंदा बंडा जिल्हा महिला कार्यकर्त्या,रमाकांत बंडा ता.अध्यक्ष, त्रिवेणी ठाकुर तालुका महीला अध्यक्षा, मनोहर मोकल तालुका आध्यत्मिक प्रमुख, नारायण गावंड तालुका प्रसिद्धी प्रमुख, चंद्रकांत पाटील, नारायण पाटील (सर), मोतीराम म्हसकर, के.एन.ठाकुर, रोशन पाटील, कल्पना भंडारी, गुरुभगिनी शोभा तेलंग यांच्यासह श्री संप्रदाय उरण तालुक्याचे पदाधिकारी सदस्य, शिष्य वर्ग उपस्थित होते. शेवटी माऊलींचा गजर करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## माथेरानमध्ये महाशिवरात्रीला भाविकांची मांदियाळी



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये महाशिवरात्रीला ग्रामदैवत श्री पिसरनाथ महाराज या शिव मंदिरात मांदियाळी दिसत होती. सकाळपासून भाविकांची गर्दी दिसत होती. हर हर महादेवाच्या जयघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता.दर मंगळवारी या मंदिरात गर्दी होत असते आणि त्यातच महाशिवरात्री सुध्दा मंगळवारी आल्याने भाविकांची त्याचप्रमाणे पर्यटकांनी सुध्दा ग्रामदैवत श्री पिसरनाथ मंदिरा सह दुस–या शिवमंदिर येथेही जाऊन यावेळी दर्शनाचा लाभ घेतला. तर पंचवटी नगर येथील शिवसेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांनी बांधलेल्या शिवमंदिरात भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला यावेळी माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि महिला मंडळ मोठया संख्येने उपस्थित होते.

### CHANGE IN NAME

I, MRS. AMUTHADEVI CHANDRAKANT have changed my name from MRS. AMUTHA CHANDRAKANT to MRS. AMUTHADEVI CHANDRAKANT as per Affidavit dated:23/02/2022 Reg No.- 26/6007.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री.विष्णू आत्माराम पाटील यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे : वाजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं. | भु–धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३८ | २ | ९.६० पो.ख. १.३० एकूण क्षेत्र १०.९० | ०.७० |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी कोणाचाही, कोणताही, मालकी हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा–कब्जा, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, अटॅचमेंट, बोजा, दावा, साठेकरार वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सही करणाार यांचे पत्यावर रजि. पोस्टाने अथवा समक्ष येवून लेखी हरकत द्यावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २/०३/२०२२

**सही/–**
**अ‍ॅड.रमेश शिवराम खंडाकळे**
**साई निल दर्शन इमारत, ए विंग**
**मु.विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.७३८७६२६१०८**

---

मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१६/३/२०२२

कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते (मयत) यांचे कायदेशीर वारस
श्रीमती.शुभांगी सिद्धार्थ मोहिते
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल–४१०२०६
कु.सुमेधा सिद्धार्थ मोहिते
वय : २५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल–४१०२०६
कु.सौरभ सिद्धार्थ मोहिते
वय : २१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी,
प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल–४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसने सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते (मयत) यांचे वारस अर्जदार श्रीमती.शुभांगी सिद्धार्थ मोहिते (मयत) यांचे वारस अर्जदार श्रीमती.शुभांगी सिद्धार्थ मोहिते ह्या पत्नी आहेत. कु. सुमेधा सिद्धार्थ मोहिते ही मुलगी आणि कु.सौरभ सिद्धार्थ मोहिते हा मुलगा आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते यांचा मृत्यू दि.१३/०२/२०१५ रोजी त्याच्या राहत्या घरी म्हणजेच रुम नं.००१, पुष्प कुटीर सोसायटी, प्लॉट क्र.६७, सेक्टर ४, नवीन पनवेल ४१०२०६ येथे झालेला आहे.

कै.सिद्धार्थ भाग्या मोहिते यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**बँक खात्याच्या मिळकतीचे वर्णन**

| बँक नाव | शाखा | एफ डी/खाते क्र. | रक्कम |
|---|---|---|---|
| भारतीय स्टेट बँक | नवीन पनवेल | ३४१३२७०३८३० | ५,००,०००/– |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न कोल्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदारास वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ०२ दिनांक ०३ माहे सन २०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.एन.बी.पावशे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१९७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

१) कु.अक्षय अनंत गायकर
वय : २९ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्रीमती.आनंदीबाई शंकर गायकर
वय : ७६ वर्षे, धंदा : काही नाही
दोघे रा.हनुमान मंदिर जवळ, चिखले गाव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
१) कु.युगांत अनंत गायकर
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
२) कु.खुशबू अनंत गायकर
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
३) श्रीमती.वंदना अनंत गायकर
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.चिखले गाव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.अनंत शंकर गायकर हे दि.१५/०९/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.अनंत शंकर गायकर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असले बाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.अनंत शंकर गायकर यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**अ) घर मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळत क्र.३०९ आर.सी.सी.घर (क्षेत्र ७३.६० चौ.मी)**

**ब) कै.अनंत शंकर गायकर यांच्या सामाईक मालकीच्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.**

**मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १ | ६७/१ | ०–०९–०० | १.६९ |
| २ | ७०/१ | ०–०५–०० | ५०.०० |
| ३ | १२४/१/ब | ०–०२–३० | ०.५४ |

वरील अर्जदार व सामनेवाले हे मयत कै.अनंत शंकर गायकर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.अनंत शंकर गायकर यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२/३/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब कोर्ट

अर्जदारतर्फे वकील
अ‍ॅड.एस.व्ही.क्षीरसागर, अ‍ॅड.निवृत्ती बी.पावशे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२४३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

१) श्री.आशुतोष संजय चव्हाण
वय : २८ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.गौरव संजय चव्हाण
वय : २६ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) सौ.किशोरी संजय चव्हाण
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
४) सौ.बड्याबाई आनंदराव चव्हाण
वय : ७६ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.रुम नं.एच–८, एलआयजी–१,
जोसेफ शाळेजवळ कळंबोली, कळंबोली नोड, ४१०२१८
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.संजय आनंदराव चव्हाण हे रा.रुम नं.एच–८, एलआयजी–१, जोसेफ शाळेजवळ, कळंबोली, कळंबोली नोड, ४१०२१८ ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी होते व ते दिनांक २९/१०/२०२० रोजी सह्याद्री सुपर स्पेसियालिटी हॉस्पिटल पुणे येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी श्री.आशुतोष संजय चव्हाण व इतर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| १ | सदनिका क्र.एल.आय.जी.१ एच–८, तळमजला, प्लॉट नं.०३/०६, सेक्टर ०३, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८, क्षेत्र १२.०० चौ.मी. बांधीव |
| २ | सदनिका क्र.११०३, अकरावा मजला, शिवालिक हाईटस, प्लॉट नं.४३, सेक्टर २०, रोडपाली, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८, क्षेत्र ४०.९४३ चौ.मी. कारपेट, एनक्लोज बाल्कनी १०.११५ चौ.मी., सी.बी.१.५७५ चौ.मी., टेरेस २.४९७ चौ.मी. |
| ३ | सदनिका क्र.१५०७, १५ वा मजला, तुलीप–एफ–३ मौजे–वारदोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६, क्षेत्र ४५.८५ चौ.मी. कारपेट |

वरील अर्जदार हे मयत कै.संजय आनंदराव चव्हाण हे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.राजदूत भागवत शिंदे यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.२/३/२०२२ रोजी माझी सही, न्यायलयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अ‍ॅड.निखील भोईर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३५/२०२०
नि.नं.३७/ड
ने.ता.०६/०४/२०२२

श्रीमती.शारदा कृष्णा पाटील
वय : ६६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
श्री.कैलाश कृष्णा पाटील
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
श्री.राहूल कृष्णा पाटील
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
अर्जदार क्र.१, २ आणि ३ राहणार ४० बी,
काशी निवास, धुतूम, पो.जासई, ता.उरण,
जि.रायगड, पिन कोड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.कृष्णा महादेव पाटील हे दि.१९/०१/२०१७ रोजी मौजे : धुतूम, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.काशिबाई महादेव पाटील ह्या सन १९६० पूर्वीचे मौजे : धुतूम, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे मयत झालेली आहे. त्यांचे मालकीची मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत कै.कृष्णा महादेव पाटील व कै.काशिबाई महादेव पाटील यांचे अर्जदार हेच एकमेव कायदशीर वारसदार आहेत असे ठरविण्याकरिता अर्जदारांनी कै.कृष्णा महादेव पाटील व कै.काशिबाई महादेव पाटील यांचा वारस दाखला मिळणेसाठी उरण येथील मे.दिवाणी न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे : नवघर यु.के.नं.२४७ ब | ३७१ | १० | ०–०५–६ |
| | ३६६ | १ ड | ०–२०–० |
| | ३७९ | ५ ब | ०–०९–१ |
| मौजे : नवघर यु.के.नं.७१/८५ | ३६५ | ५ | ०–१३–० |
| | ३६५ | ६ | ०–१३–५ |
| | ३८७ | ८ अ | ०–०८–८ |
| मौजे : नवघर यु.के.नं.१९३ब/८५ | ३६१ | १ क | ०–१०–० |
| | ३७९ | १० क | ०–०९–९ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात भूखंड प्रदान केले जाणार आहेत. श्रीमती. शारदा कृष्णा पाटील वगैरे २ हेच कै.कृष्णा महादेव पाटील व कै.काशिबाई महादेव पाटील यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस कोणत्याही प्रकारच्या हरकती घ्यावयाच्या असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज रोजी दि.२८/०२/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

